INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 3 | APRIL– 2020

# कोल्हटकरांचा विनोद : सामाजिक पैलू

प्रा. विनोद गायकवाड
मराठी विभाग, राणी चन्नम्मा विद्यापीठ, बेळगांव.



सांस्कृतिक क्षेत्रातील अनिष्टांचा उपहास कोल्हटकर काही एक निश्चित भूमिका घेऊन लेखन करताना दिसतात. त्यांच्या भूमिकेविषयी डॉ. गो. मा. पवार म्हणतात, सामाजिक जीवनातील व्यंगाचे भेदक परंतु तितकेच विनोदात्म चित्रण करुन व्यंगरहित सामाजिक जीवनाची जाणीव करुन देणे ही जीवनदर्शनाची प्रेरणा त्यांच्या उपहासरुप विनोदाच्या मुळाशी आहे. याच प्रेरणेतून ते सांस्कृतिक क्षेत्रातील अपप्रवृत्तीकडे, अनिष्टांकडे पहातात व त्यावर उपहास, उपरोधाचे हत्यार चालवून विनोदनिष्पत्ती साधतात.

'वर्तमानकर्ता' हा लेख या दृष्टीने पहाता येईल. वर्तमानपत्रे ही संस्कृतीचे संवर्धन करतात. परंतु त्यातही अनिष्ट गोष्टी घुसल्या. प्रत्यक्ष घटना घडलेली नसतानाही केवल छापील वा ऐकीव माहितीवर आधारीत 'रिपोर्टिंग' करणे, सन्यातन्यांचा वाचकवर्ग वाढविण्यासाठी सुधारकांवर टीकास्त्र सोडणे, वर्तमानपत्री ठोकळेबाज शब्दप्रयोग, एखाद्या विशेष व्यक्तिचा मृत्यू होण्यापूर्वीच त्याजवर मृत्युलेख लिहिणे परिणामशून्य औषधांची परिणामकारक जाहिरात करुन पैसा कमविणे इ. इ. गोष्टींचा फर्मास उपहास त्यांनी या लेखात केला आहे.

कुणीही उठून वृत्तपत्र काढण्याच्या वृत्तीचा उपहास करताना ते लिहितात, 'हळूहळू माझ्या दुकानाची (मिठाईची) विक्री वाढत चालली, ती शेवटी इतकी वाढली, की पुडे बांधण्यास रद्दी कागद मिळण्याची मारामार पडू लागली. ही जी कागदाची टंचाई पडू लागली, तिच्यामुळे वर्तमानपत्र काढण्याचा विचार प्रथमतः माझ्या मनात आला.' या वर्तमानपत्राचे नांव 'नितिमेवा' असे ठेवले जाते.

'चोरांचे संमेलन' या लेखामध्ये विविध संमेलनातील विसंगतीची खिल्ली उडविली आहे. 'चोर व ग्रंथकार या उभयतांचा हेतू अर्थ चौर्याचाच असल्यामुळे दोघांचे एकच संमेलन भरविण्यात यावे, अशी ग्रंथकारांच्या संमेलनास विनंती करण्यात यावी' असा ठरावही इथे केला जातो.

'भाषा व इतिहास' या लेखामध्ये सांस्कृतिक दृष्ट्या महत्वाच्या असलेल्या शीर्षस्थ दोन गोष्टीविषयी उपरोधपूर्ण विचार मांडून त्या क्षेत्रात धुमाकूळ घालणाऱ्या अडाणी–तज्ञांची टवाळी उडविली आहे. अशा प्रकारे उपहास, उपरोध आणि कोट्यांचा वापर करुन कोल्हटकर सांस्कृतिक क्षेत्र बरबाद करणाऱ्या अनिष्ट गोष्टींचा विनोदात्मक समाचार घेतात.

### हिंदूधर्मातील रुढींचा उपहास :

कोल्हटकरांचे जातीविषयक विचार तर्कनिष्ठ व कठोर होते. तो काळ कर्मठांच्या प्राबल्याचा असूनही त्यानी जातीचिकित्सा परखडपणे केली. 'स्वतःच्या देशबांधवास व धर्मबांधवास पशूपेक्षाही नीच मानणाऱ्या आम्हास परदेशात परधर्मियांकडून पशूपेक्षा अधिक मान मिळत नाही. याचा अचंबा किंवा राग मानण्याचा आम्हांस काय हक्क आहे? असा रोखठोक सवाल त्यांनी 'सुदाम्याचे पोहे' च्या प्रस्तावनेत केला आहे. 'धर्मांतर' लेखात बंडूनाना महारामांगाच्या खात्यात रकमा मांडल्यावर लेखणीचे टोक पाण्याने धुतात. या कामासाठी ते निराळी दौत वापरतात आणि दौतीची कलमदानावर सावली पडू नये एवढे अंतर राखण्याची दक्षता घेतात. या पराकोटीच्या अस्पृश्यतेमुळे व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होतो.

### सनातन्यांच्या अडाणीपणावर टीका :

सनातन्यांच्या अज्ञानमूलक आणि अतिरेकी वर्तनावर कोल्हटकर प्रभावी टीका करतात. त्यांच्या संबंध लिखाणामध्ये अशा टीकेची उदाहरणे विपुलतेने आढळतात. 'शिमगा' या लेखात त्यांनी यथेच्छ थट्टा केली आहे.

शिमग्याचे आरोग्याला होणारे फायदे सांगताना सुदामा म्हणतो, 'चोहोकडे होळ्या पेटवल्याने हवा स्वच्छ होते, पांचजन्य केल्याने फुफ्फुसे साफ होतात व शेणाच्या शिडकाव्याने आरोग्य वाढते, हे कोणीही डॉक्टर कबूल करील. आमच्या पूर्वजास आरोग्यशास्त्राचे व शरीरशास्त्राचे फार मार्मिक ज्ञान होते. हे सूक्ष्म निरीक्षण करणाऱ्या कोणाही समंजस मनुष्यास उघड दिसून येईल' अशा पध्दतीचा उपहास व उपरोध या ग्रंथाच्या पानापानांवर विखूरला आहे.

### अज्ञानमूलक धर्माचरणाची विनोदी चिकित्सा :

कोल्हटकर अनेक विसंगत गोष्टींचे वाभाडे सप्रमाण काढतात. अनेक मूर्खपणांच्या गोष्टींचे आचरण 'धर्माचरण' नावाखाली राजरोसपणे चाललेले असते. उपरोक्त शिमग्याचे उदाहरण त्यातलेच. 'गणेशचतुर्थी' मध्येही गणपतीचे हात, उंदीर, त्याचे खाणे यांचा खुमासदार उपहास आहे. 'लग्नसमारंभ' या लेखात अशा अनेक गोष्टींची विनोदात्मक चिकित्सा ते करतात. त्यांचा कल्पनाविलास विनोदाला कारण होतो.

### हिंदूंची धर्मनिष्ठा व त्यातील फोलपणा :

हिंदू लोकांच्या धर्माचरणाची चिकित्सा करतानाच त्यांच्या धर्मनिष्ठेवरही ते विलक्षण तीव्रतेने कोरडे ओढताना दिसतात. हिंदूंची धर्मनिष्ठा बेगडी व आपमतलबी असल्याचे ते सप्रमाण दाखवू देतात.

'गणेशचतुर्थी' या लेखात सुदाम म्हणतो, 'आम्हा आर्य लोकांस आमचे देव फार आवडतात. याचे रहस्य हेच आहे, की त्यांच्या अंगी विशालता, तेजस्विता, पराक्रम वगैरे सदगुण जसे असतात तसे कपटशीलता, चौर्य, व्यभिचार इ. आम्हा मनुष्यास वास करणारे दुर्गुणही दिसून येतात व त्यामुळे सज्जनांप्रमाणे दुर्जनासही ते फार प्रिय वाटतात.' धर्माचरणामध्ये अनेकदा भाविकतेचे ढोंग केले जाते अशा ढोंगी धर्मनिष्ठेचे फर्मास विडंबन कोल्हटकर करतात.

### दैनंदिन जीवनातील विधिनिषेधात्मक नियमातील हास्यास्पदता :

हिंदू धर्मातील अनेक धार्मिक विधींनी मोठा हैदोस घातला होता. विधिनिषेधात्मक विधींचे आचरण हे त्रासदायक व अडाणीपणाचे द्योतक होते. त्यातील हास्यास्पदता कोल्हटकर आविष्कृत करतात. 'सुदाम्याच्या पोह्या' च्या प्रास्ताविकात ते म्हणतात, आपणामधील विधिनिषेधात्मक नियमांनी मनुष्य इतका जखडून जातो की त्यांच्या पुरुषार्थास अवसरच रहात नाही. कर्मठांचा तर पहाटे चार वाजेपासून रात्री दहा वाजेपर्यंत सारा काळ प्रातःर्विधी, काकड आरती, स्नान, संध्या, पूजा, वैश्वदेव, जपजाप्य, मंत्रपठण, स्तोत्रपठण, पुराण श्रवण, देवदर्शन, शेजारती इ. व्यवसायात विभागलेला असतो...पुरुषापेक्षा स्त्रियांची व्रते सहाजिकच विपूल व घोटाळ्याची असतात. दुष्काळात

गरिबांस पोटास पुरेसे अन्न व पाठीस पुरेसे वस्त्र मिळत नसतानाही बायकांच्या लक्ष लक्ष वाती तुपात जळतच असतात.' या सर्वांतील हास्यास्पदता कोल्हटकरांनी विनोदात्मक केली.

## सामाजिक जीवनातील व्यंगाचे चित्रण :

आपले सामाजिक जीवन अनेक विसंगतीनी भरलेले आहेत. या विसंगती व अगणित व्यंगे सर्वसामान्यांच्या दुःखाला कारण होतात. एखाद्या गरीब फेरीवाला डोकीवर माल घेऊन घरोघर विक्रीसाठी जातो तेंव्हा त्याची अहवेलना होते. पण तोच फेरीवाला सचोटीचा व्यापार सोडून कपाळी गंध लावून, हातात पंचपळीपात्री घेऊन गळ्यात जानवे अडकवले म्हणजे त्याला घरचे यजमान सामोरे जाऊन उच्चासनावर बसवतात आणि त्याने इच्छा दर्शविताच त्याला पंचपक्वान्नांचे भोजन देऊन व दक्षिणाही देतात. 'याचक' या लेखात वरील भाग सांगून पुढे सुदामा निष्कर्ष असा काढतो. 'असा प्रकार जोपर्यंत चालू आहे तोपर्यंत व्यापाराचा उत्कर्ष व आळसाचा नायनाट कसा व्हावा?' सामाजिक अपसमजावर याचकासारख्या जळवा तयार होऊन समाजाचे रक्त शोषत राहतात, यावर इथे मार्मिकपणे बोट ठेवले आहे.

## व्यंगरहित सामाजिक जीवनाची जाणीव करुन देणे.

कोल्हटकरांच्या विनोदा–मागील प्रेरणांविषयी डॉ. गो. मा. पवार लिहितात, 'सामाजिक जीवनातील भेदक परंतु तितकेचे विनोदात्मक चित्रण करुन व्यंगरहित सामाजिक जीवनाची जाणीव करुन देणे ही जीवनदर्शनाची प्रेरणा त्यांच्या उपहासरुप विनोदाच्या मुळाशी आहे. त्यांचे 'शिमगा' , 'श्रावणी', गणेशचतुर्थी' , 'धर्मांतर', 'यशःसिध्दीचे सोपे व अचूक मार्ग' इ. उपहासपर लेख या प्रेरणेतून निर्माण झाले आहेत. समाजात प्रचलित असलेली व्यंगे दाखवत असतानाच नकळत व्यंगरहित सुंदर समाजाचे चित्रही दुसऱ्या बाजूने उभे करण्याचे विनोदाचे कार्य इथे कोल्हटकरांनी दर्शविले आहे.

## रंजनप्रेरणा :

कोल्हटकर हे म्हणजे आद्य विनोदकार. त्यांची विनोदप्रवृत्ती केवळ हेतूबध्द रहाणे शक्यच नाही. त्यामुळेच केवळ विनोदासाठी, रंजनासाठीही त्यांनी अनेक लेख लिहिले. उपहास, कोटी, उपरो वक्रोक्ती, व्यजोक्ती, अतिशयोक्ती इ. नी हे लेख बहारदार हास्योत्पादक झाले आहेत. गो. मा. पवार म्हणतात. अनुभवाची विक्षिप्त रुपे करणाऱ्या कोटीरुप विनोदाच्या मुळाशी सामान्यतः प्रेरणा होती ती रंजन करण्याची. 'आमचे बैठे खेळ', 'आमच्या गोवातील पाण्याचे दुर्भिक्ष्य' इ. लेखांची निर्मिती या प्रेरणेतून झालेली दिसते. त्यांच्या साहित्यात अशी अनेक उदाहरणे आढळतात. उदा. 'कुलुप' या कथेची सुरुवात अशी आहे. 'कुलुपासारखा रखवालदार त्रिभुवनात सापडणार नाही ! अशीच उदाहरणे 'गवई', 'चोरांचे संमेलन', 'याचक', 'म्हातारपणाचे फायदे', चित्रगुप्ताचा जमाखर्च', 'लेखनकलेतील स्थित्यंतरे', आदी लेखातही आढळतात. उत्तम कोट्या, उपहास, बहारदार अतिशयोक्ती, अनुभवांची रंजक मोडतोड, आशयातील चमत्कृती व हास्योत्पादक आविष्कार यामुळे ही रंजनप्रेरणा दर्जेदार विनोद निर्माण करते.

## देवताभंजन – मूर्तीभंजन :

व्यंगरहीत समाजनिर्मिती करावयाची असेल तर अनेक खुळचट गोष्टींचे भंजन करणे जरुर असते. 'देव' ही कल्पना मान्य केल्यामुळे तिला खूष राखण्याच्या प्रयत्नातून अनेक वेडगळ धर्मश्रध्दा व रुढी निर्माण झाल्या त्यामुळे या सगळ्यांचेच मूर्तीभंजन करणे कोल्हटकरांना आवश्यक वाटले. त्यामुळे त्यांनी देवदेवतांनाही सोडले नाही. गणेशचर्तुर्थी या लेखात हे देवताभंजन हे प्रभावीरित्या त्यानी केले आहे. सुदामा म्हणतो, 'प्रत्येक आर्य चोरास असे वाटत असते की पांच हजार वर्षापूर्वी श्रीकृष्ण परमात्म्याने दूध चोरण्याचे जे दैवी कृत्ये केले तेच मी आज करीत आहे. आर्य जार सुध्दा श्रीकृष्णाच्या 1/16000 अंशाने तरी आपल्या हातून पराक्रम घटला असे मानून किंवा इंद्राचा

अहिल्येवरचा विजय आठवून आपणास धन्य समजतो. तमाशातल्या आर्य पोरांसही श्रीविष्णूच्या मोहिनीरुपाची आठवण होवून डोळे मुरडण्याची व दौलतज्यादा करण्याची स्फूर्ती होत असते. याप्रमाणे आमच्या देवांचे कित्ते समोर ठेवून आम्हां मधील चोरजादादी सर्व लोक 'कर्मण्यवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' ही भागवदुक्ती मनात बाळगून वागवून, परिणामाकडे लक्ष न देता, आपापले व्यवसाय पार पाडीत असतात.'

उपरोक्त देवतार्भजन विनोदात्म असल्यामुळे आस्वाद्यही झाले आहे. देवतांविषयींच्या आपल्या कल्पना ते हास्यास्पद बनवितात. समाजविरोधाला किंवा सनातनी टीकेला भीक न घालता श्रीपाठ कृष्णांनी हे केले, हे विशेष होय. या सर्वांतून विनोदनिर्मीतीमागील त्यांची विधायक दृष्टीच दिसून येते.

## स्त्रियांच्या दयनीय स्थितीकडे लक्ष वेधणे :

तत्कालीन स्त्रियांच्या दु:खाला पारावर नव्हता. ती उपभोग्य 'वस्तू' होती बालविवाह, बालाजरठविवाह यामुळे त्यांच्या दु:खात भरच पडत होती. विधवांची स्थिती तर अतिभयानक, केशवपन, वस्त्रेप्रावण्यावर बंदी, खाण्यावरील मर्यादा, समाजात फिरण्यास बंदी. सर्वत्र अशुभाचा शिक्का या सर्वांची चीड येऊन श्रीपादकृष्णांनी त्यावर उपहास–उपरोधाचे विनोदात्मक अत्यार चालविले. 'सूदाम्याचे पोहे' मधील विविध लेखांतील पुढील विधानातून त्याची प्रचीती येते.

1] या सुधारकांनी विधवांच्या लग्नाचा सपाटा लावून शत्रूस दु:चिन्ह करण्याचे आमचे सनातन धर्मियांचे एक मोठे साधन हिरावून नेले आहे.

2] मुलींना शिक्षण दिले म्हणजे त्या वल्लभास प्रणयपत्रिका पाठवतात वाममार्गास प्रवृत्त होतात, अशी माझी पक्की खात्री आहे.

3] स्वयंपाकघर, माजघर हाच आमच्या बायकांचा भूगोल आणि घरातील गाऱ्हाणी व शेजाऱ्यांच्या नालस्त्या हाच खरा त्यांचा इतिहास आहे. पक्वान्ने करणे हेच त्यांचे रसायनशास्त्र आणि कुंकू लावणे, गोंदणे हीच चित्रकला. पतीचे हदगत जाणने हे गणित आणि चाळणे, पाखडणे व निवडणे हेच त्यांचे तर्कशास्त्र!

वरील विधानातून व्यंगोक्ती, वक्रोक्तीद्वारे हास्यनिष्पत्ती होत असली तरीही स्त्रियांच्या दयनीय स्थितीकडे लक्ष वेधल्यामुळे मन चरचरते; विचारप्रवृत्त होते. विनोदातून कोल्हटकर विवेकशून्य समाजाच्या डोळ्यात अंजन घालतात.

## कोल्हटकरी विनोदाच्या अभिव्यक्तीची रुपे :

कोल्हटकरांनी मराठीमध्ये संपन्न विनोदाची परंपरा निर्माण केली. त्यांच्यानंतरच्या अनेक विनोदी लेखकांवर त्यांच्या विनोदाचा प्रभाव स्पष्टपणे आढळतो. त्यामुळे त्यांच्या विनोदाच्या अभिव्यक्तींची वैशिष्ट्ये अभ्यासणे आवश्यक ठरते.

## कोटीरुप विनोद :

कोल्हटकरांची विनोदबुध्दी कोट्या करताना बहरते. त्यांची बौध्दिक व शाब्दिक चमत्कृतीपूर्ण कोटी वाचकाला स्तिमित करुन हसायला लावते. काही उदाहरणे पाहाता येतील.

## गणेशचतुर्थी :

'त्याच प्रकारची पुनरावृत्ती सुधारकांसंबंधाने घडून येईल व त्यांच्या दात विचकण्याबद्दल आमचा एक दंत देव त्यांची बत्तीशी एक दिवस पाडील – ही माझी खात्री आहे.'

### हजामतीची नीतिमीमांसा :

'खंडेराव महाराजांच्या कारकिर्दीत जसे मल्ल्यांचे व तमाशांचे पिकले होते तसेच अर्धवट रानटी अवस्थेत न्हाव्यांचे पिकले असले पाहिजे व केवळ शब्दशःच नव्हे तर लाक्षणिक अर्थानेही सर्व राज्याची शेंडी त्यांच्या हाती आली असली पाहिजे.

### याचक :

असे जटाघनपाठ एकदा सुरु होवून वेदांच्या चिंधड्या होवू लागल्या म्हणजे असे वाटते, की हे जटासाठी, घनपाठी जातीने ब्राह्मण नसते तर त्यांच्या जटा धरुन व पाठीवर घण मारुन त्या पाठीच्या चिंधड्या उडविल्या असत्या'

वारंवार आपला कुणी नातेवाईक मेल्याचे सांगत येऊन पैसे उकळणाऱ्या हसनभाईला पांडूतात्या सुनावतात. 'तुझ्या साऱ्या माणसांना पुरुन उरण्याइतका आमच्यापाशी पैसा नाही. आता तुला एकच निर्वानीची गोष्ट सांगतो, की यापुढे तुझ्या स्वतःच्या दफानकरीताच तुला आम्हाकडून पैसा मिळेल' ही कोटी तर मराठी वाड्मयात अजरामर झालेली आहे.

श्रीपाद कृष्णाच्या कोट्या अशा ताज्या, रसरशीत आहेत. कारण आजही त्या हशा पिकवितात. शब्दांची फिरवाफिरव, पुनरावृत्ती आणि कल्पनाजन्य चमत्कृती यातून त्यांची कोटी सिध्द होते.

उपहासात्मक विनोद :

कोल्हटकरांना सामाजिक व्यंग प्रकर्षाने जाणवते. व्यंगरहित आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोचरहित समाजरचनेचा त्यांचा ध्यास होता. यातूनच त्यांचा उपहास प्रकटतो. प्रगल्भ बुध्दिमत्ता आणि सखोल निरीक्षण आणि सूक्ष्म व्यासंग यामुळे त्यांचा उपहास धारदार होतो.

'याचक' लेखामध्ये सुदामा म्हणतो, 'आपल्या देशातील दारिद्र्याबरोबर याचकांचीही संख्या वाढतच चालली आहे. 'यापुढे भिक्षुकांबद्दल तो सांगतो, 'केवळ एकदोन वेदमंत्राच्या जोरावर जो भिक्षुक घरोघर दक्षिणा उपटीत फिरतो, त्याला गंधापलीकडे भांडवल लागत नाही. आणि दहा घरे फिरण्यापुरते मजबूत पाय, बडबड करुन यजमानास शरण आणण्यासारखे भक्कम तोंड यापलीकडे अंगाची तयारी लागत नाही. त्यांचे खरे भांडवल व खरी तयारी म्हणजे इतरांची श्रध्दा व भोळसटपणा ही ती त्यांच्यासाठी ब्रह्मदेवाने पूर्वीच निर्माण केलेली असते'. इथे याचकाचाच नव्हे तर यजमानांचाही उपहास केलेला आहे.

सनातन्यांची उपहासपर चेष्टा करताना कोल्हटकरांना विशेष चेव येतो. 'चित्रगुप्ताचा जमाखर्च' मध्ये बंडूनाना स्वर्गप्राप्तीची कारणमीमांसा अशी करतात, '..एकादस्या व अभिषेक करुन आपण कितीतरी पाणी देवाच्या डोईवर ओतले. आपला शिमग्यातला व सरणाभोवतीचा शंखध्वनी कधीही चुकला नाही. पंचगव्याचे तर अनेक रांजन आपण घशाखाली ओतले! श्राध्दपक्ष करुन पितरांचा संतोष नेहमी राखत आलो. देवांस मुरळ्या वाहण्याच्या चालीला नेहमी उत्तेजन देत आलो. शुध्दाचरणी महाराचाही स्पर्श झाल्यास स्नान केल्याशिवाय कधीही राहिलो नाही.

विधवा स्त्रिया सोवळ्या करण्यासाठी आपण जीवापाड मेहनत घेतली. या बोचक्यातला निम्माअधिक भाग तर त्यांच्या केसांनीच भरला असेल..?इ. इ.

कोल्हटकरांचा उपहास सर्वंकष आहे. आडाणी समजुती जात-धर्मातील अज्ञानमूलक आचरण, कर्माकांड, अंधश्रध्दा, मानवी स्वभावातील विक्षिप्तपणा आणि विकृती, बोलके सुधारक, भंपक याचक, खोटारडे ज्योतिषी अशा अनेक गोष्टींचा उपहास करुन ते विनोदनिष्पत्ती साधतात. यामध्ये सूक्ष्म तार्किकता दिसून येते.

### अतिशयोक्ती :

उत्तम कोटीक्रम करीत अजब तर्कशास्त्राचा वापर करत अतिशयोक्तीद्वारा कोल्हटकर विनोदनिष्पत्ती करतात. अतिशयोक्तीतून काही वैगुण्यांचा निर्देश करण्याचाच त्यांचा हेतू असतो. अनेकदा शुध्द विनोदासाठीही ते अतिशयोक्तीचा वापर करतात.

'शिमगा' या लेखात एक प्राध्यापक इंग्रजांच्या सुधारणा या नव्या नसून त्या पूर्वीच आपल्याकडे होत्या हे सिध्द करताना सांगतो, 'अग्निमीळे पुरोहित' म्हणजे आगगाड्या पूर्वी आपणाकडे होत्या. शिवाय 'वेदात बूटपाटलून' आहे. स्मृतीत चष्मे आहेत, अगस्त्य ऋषींनी सोडावाटरचा कारखाना काढला होता. 'पूर्वीचे ऋषी मद्यमांस सेवीत असत!' यावर सुदामा अशी टिपणी करतो, 'वशिष्टऋषी जेवताना संबंध बैल पार करीत व इंद्र तर उल्लू होवून गटारात पडला होता. या टारम्या लोकांचे सर्व प्रकार आमच्या पूज्य पूर्वजांनी उष्टे करुन टाकले आहे.' इथे सनातनी लोकांचा उपहास व त्यांचे पराकोटीचे समर्थन यातील विसंगती दाखविण्यासाठी अतिशयोक्तीद्वारा केले आहे. भविष्यकथनाची साधने मध्ये आवाच्या सव्वा भविष्य सांगणाऱ्यांचा उपहास अतिशयोक्तीतून केला आहे. 'चोरांचे संमेलन' मध्ये साहित्यिकांचे स्वभावदोष दाखविण्याबरोबरच खास विनोदनिर्मीतीसाठी कल्पनाजन्य अतिशयोक्ती आली आहे. चोरांच्या संमेलनाचा अध्यक्ष हा उचल्या, भामटा, चोर, घरफोड्या, दरोडेखोर अशा पदव्या मिळवत मोठा होतो. त्यांची ओळख अशी करुन दिली जाते. '(यांच्या कुळातील) प्रत्येकजण दरवड्यात सापडून फासावर लटकत आला. फाशी जाण्याची चाल या वंशात पिढीजात चालत आल्याचा परिणाम असा झाला आहे की त्यांच्या कुळात जन्मलेल्या प्रत्येक मुलाच्या गळ्याभोवती खिराडीच्या पन्हाळीप्रमाणे एक करकोचा असतो.'

अशा पध्दतीची अतिशयोक्त वर्णने केवळ हास्य निष्पत्तीसाठीच आहेत. हास्यनिर्मितीबरोबरच व्यंगरहित समाज निर्माण करणारे समाजसुधारक होल्हटकरच ठळकपणे उठून दिसतात. त्यांचे प्रसंगनिष्ठ विनोदाचे हे योगदान आजही मान्य करावेच लागते.